राज्यास भेट देणाऱ्या मा.राज्य अतिथी व इतर मान्यवरांच्या परिवहन सेवेसाठी भाडयाने घेण्यात येणाऱ्या खाजगी वाहनांची देयके सविस्तर तपशीलासह विहित नमुन्यात सादर करण्याबाबत.....

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग ( राजशिष्टाचार)
शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०२४/प्र.क्र.६६/राशि-३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- २७ मार्च, २०२६

वाचा :-१) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक-डिव्हीसी-१०१५/प्र.क्र.९८/३१, दिनांक २३ फेब्रुवारी २०१७
२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक-वाहन-२०१४/प्र.क्र.४३/का-३१, दिनांक १४ फेब्रुवारी, २०२४
३) सामान्य प्रशासन विभाग,पत्र क्रमांक-संकीर्ण-२०२४/प्र.क्र.६६/का-३१ (शापसे)(राशि-३), दिनांक १२ जुलै, २०२४
४) सामान्य प्रशासन विभाग, पत्र क्रमांक-वाहन-२१२४/प्र.क्र.२०३/राशि-३, दिनांक २१ ऑक्टोबर, २०२४
५) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०२६/प्र.क्र.०६/२०२६/कोषा प्रशा-५, दिनांक ०६ फेब्रुवारी, २०२६

**शासन परिपत्रक :**

राज्यास भेट देणाऱ्या भारताचे मा.राष्ट्रपती, मा. उपराष्ट्रपती, मा. पंतप्रधान, इतर देशाचे मा.राष्ट्रपती, मा.पंतप्रधान, केंद्रीय मंत्री, राज्यमंत्री, इतर राज्यांचे मा.राज्यपाल, मा. मुख्यमंत्री, मा. सर्वोच्च / मा. उच्च न्यायालयाचे मा.न्यायमूर्ती, इतर राज्य अतिथी (State Guest) तसेच वरिष्ठ शासकीय अधिकारी यांच्या भेटी दरम्यान परिवहन व्यवस्थेचे कामकाज सामान्य प्रशासन विभाग (राजशिष्टाचार) मार्फत पाहण्यात येते.

२. महाराष्ट्र राज्यास भेटी देणाऱ्या मा. विख्यात अभ्यांगतांच्या दौऱ्यादरम्यान त्यांच्या परिवहन व्यवस्थेसाठी प्रत्येक जिल्ह्यातील डी.व्ही वाहनांची (Distinguished Vehicle ) संख्या निश्चित करण्यात आलेली असून ३४ जिल्ह्यांकरिता २२५ डी.व्ही वाहने संदर्भ क्र. १ येथील दिनांक २३ फेब्रुवारी, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेली आहेत. तसेच मुंबई येथे भेट देणाऱ्या मा. विख्यात अभ्यांगतांच्या दौऱ्यादरम्यान त्यांच्या परिवहन व्यवस्थेसाठी संदर्भ क्र. २ येथील दिनांक **१४ फेब्रुवारी, २०२४** रोजीच्या शासन निर्णयान्वये ६४ वाहने मंजूर करण्यात आली आहेत. सदरील डी.व्ही वाहने ( Distinguished Vehicle ) अनुक्रमे जिल्हाधिकारी तसेच नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा यांच्या ताब्यात असतात.

३. राज्यास भेट देणाऱ्या मा. विख्यात अभ्यांगतांच्या परिवहन व्यवस्थेसाठी शासकीय वाहन उपलब्ध नसेल त्यावेळेस वर्दी करण्यासाठी शासन मान्यताप्राप्त अधिकृत भाडोत्री वाहन पुरवठादारांकडून शासकीय परिवहन सेवा, वरळी, मुंबई तसेच संबधित जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत भाडयाने वाहने घेण्यात येतात. सदरील भाडोत्री वाहन पुरवठादारांच्या

देयकाचे प्रस्ताव संबंधित जिल्हाधिकारी / नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा यांनी कसे सादर करावेत याबाबत संदर्भ क्र. ३ येथील दिनांक १२ जुलै, २०२४ रोजी सूचना देण्यात आल्या आहेत. कंत्राटी सेवांमध्ये वापरण्यात येणाऱ्या मालवाहू व अन्य वाहनांवर वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्यामुळे दंड प्रलंबित असल्याच्या बाबी निदर्शनास आल्यामुळे अशा कंत्राटी सेवेच्या वाहनांवर कोणताही वाहतूक दंड प्रलंबित नसल्याचे विहीत नमुन्यातील प्रमाणपत्र देयकासोबत जोडल्यानंतरच सदरची देयके अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई व कोषागार / उपकोषागारांनी पारित करावीत अन्यथा सदरची देयके आक्षेपित करुन आहरण व संवितरण अधिकारी यांना परत करण्यात यावीत असे संदर्भ क्र. ५ येथील दिनांक ६ फेबुवारी, २०२६ रोजीच्या परिपत्रकान्वये वित्त विभागाने निर्देश दिलेले आहेत.

४. उपरोक्त बाबी विचारात घेता, राज्यास भेट देणाऱ्या मा. विख्यात अभ्यांगतांच्या परिवहन व्यवस्थेसाठी भाडयाने घेण्यात आलेल्या खाजगी वाहनांची मूळ देयके प्रमाणित करुन शासन मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करतांना पुढील कार्यवाहीचा अवलंब करण्यात यावा.

(अ) सर्व जिल्हाधिकारी / नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा, वरळी, मुंबई या कार्यालयाकडे मान्यवरांच्या परिवहन सेवेसाठी डी.व्ही.वाहने ( Distinguished Vehicle ) उपलब्ध नसल्यास, खाजगी वाहन पुरवठादारांकडून भाडयाने घेण्यात आलेल्या वाहनांची देयके संबंधित पुरवठादारांकडून परिपूर्ण तपशीलासह मंजुरीसाठी सादर करण्यात येत नसल्यामुळे, त्या पुरवठादारास देयके अदा करण्यास विलंब होतो. सदर विलंब टाळण्यासाठी खालील बाबींची पूर्तता करुन विहित केलेल्या नमुन्यात मूळ देयके प्रमाणित करुन परिपूर्ण कागदपत्रांसह प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्यात यावेत.

मा.राष्ट्रपती / मा.उपराष्ट्रपती / मा.पंतप्रधान इत्यादी यांचा खालीलप्रमाणे ताफानिहाय वाहनांचा तपशील देण्यात यावा.

| मान्यवराचे नांव व पद : - | | | |
|---|---|---|---|
| वाहन प्रकार | ताफा-१ | ताफा-२ | राखीव ताफा |
| | स्थळ :- ..................... | स्थळ :- ................. | |
| इनोव्हा क्रिस्टा | | | |
| मिडिया कार | | | |
| मिनी बस | | | |
| एकूण वाहने = ..... | | | |
| **टीप :-** वाहन प्रकारानुसार ताफ्यामध्ये वाहनांची संख्या नमूद करावी. | | | |

(ब) देयक सादर करण्याचा विहित नमुना :

| खाजगी वाहन पुरवठादाराचे नांव :- ........................................................................ | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | वाहन वापरणाऱ्या मान्यवराचे नांव व पद | वाहन वापराचा कालावधी | देयक क्रमांक | देयक दिनांक | रक्कम (रुपये |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | मा.ना.श्री.............................<br>मा.मंत्री............................. | | | | |
| २ | मा.ना.श्री.............................<br>मा.मंत्री............................. | | | | |
| | एकूण रक्कम (अक्षरी रुपये ...................................................... फक्त) | | | | |
| **टीप :-** मा. मान्यवर निहाय तपशील देण्यात यावा | | | | | |

**(क) देयकासोबत सादर करावयाची कागदपत्रे :**

१) मा. मान्यवर महोदयांचा दौरा कार्यक्रम पत्र.

२)पोलीस विभागाकडून जिल्हाधिकारी /शासकीय परिवहन सेवा, कार्यालयाकडे वाहनांची मागणी केलेले पत्र.

३) जिल्हाधिकारी / शासकीय परिवहन सेवा,कार्यालयामार्फत वाहन पुरवठादारांकडे वाहनांची मागणी केलेले पत्र.

४)वाहनांच्या Duty Slips (नांवासहित), Duty Slips मधील वाहन वापराची वेळ आणि देयकांवरील वाहन वापराची वेळ एकसमान असावी. तसेच वाहन वापराचे तास व दिवस यांची गणना अचूक असावी.

५) Convoy लावण्यात आल्याची संख्या, स्थळ, वाहनांची संख्या, त्यांचे वाहन क्रमांक व वाहन मॉडेल यांचा तपशील.

६) उक्त कागदपत्रांसह मूळ देयक अधिक दोन झेरॉक्स प्रती.

(ड) मूळ देयकाच्या मागील पृष्ठावर संबंधित जिल्हाधिकारी / नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा यांच्या स्वाक्षरीने खालीलप्रमाणे प्रमाणित करण्यात यावे.

१) मा. मान्यवरांच्या दौरा कालावधीत शासकीय डी.व्ही.वाहन उपलब्ध नव्हते.

२) देयकात नमूद केलेले निश्चित दर शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : .................. दिनांक ............... नुसार आहेत.

३) देयकांत नमूद केलेले दर हे योग्य व वाजवी असून, शासन मान्य दर करारानुसार आहेत.

४) देयकांत नमूद केलेली रक्कम यापूर्वी वाहन पुरवठादारास अदा केलेली नाही.

५) शासन मान्य पॅनलवरील ट्रॅव्हल्स कंपनीने वाहन उपलब्ध करुन न दिल्यामुळे, पॅनलवरील दराप्रमाणे अन्य ट्रॅव्हल्स कंपनीकडून वाहन भाडयाने घेण्यात आले आहे. ( लागू असल्यास)

(इ) पोलिस आयुक्त / जिल्हा पोलिस अधिक्षक यांनी मा. राष्ट्रपती /मा. उप राष्ट्रपती /मा. पंतप्रधान यांच्या दौऱ्याच्या कमीत कमी दिवस आधी वाहन ताफा मागवावा.

(फ) मा. मान्यवरांचा दौरा पूर्ण झाल्यापासून संबंधित खाजगी वाहन पुरवठादाराकडून देयके प्राप्त करुन घेऊन, त्या देयकांचा प्रस्ताव, संदर्भ क्र. ५ येथील वित्त विभागाच्या दिनांक ६ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या शासन परित्रकान्वये सूचित केल्याप्रमाणे खालील विहीत नमुन्यातील प्रमाणपत्रासह एका महिन्याच्या आत देयक प्रदानाच्या शिफारशीसह शासनाकडे सादर करण्याची दक्षता घेण्यात यावी.

**प्रमाणपत्राचा नमुना**

दिनांक :-

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, कोषागारामध्ये सादर करण्यात आलेला देयक क्रमांक------- दिनांक -------- रु.--------- या कंत्राटी वाहन सेवेच्या देयकातील नमूद कंत्राटदार ---- (संस्थेचे नांव )------- यांचेकडे शासकीय कार्यालयांकडून वापरण्यात येणाऱ्या कंत्राटी सेवेच्या वाहनांवर, वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्यामुळे कोणताही वाहतूक दंड प्रलंबित नाही, याची खात्री करण्यात आलेली आहे.

( स्वाक्षरी )

जिल्हाधिकारी / नियंत्रक (शा.प.से.) मुंबई

५. **उपरोक्त परिच्छेद-४ मधील "अ ते फ" मध्ये नमूद केलेल्या मानक कार्यपद्धतीचा (SOP: Standard Operating Procedure) अवलंब करणे अनिवार्य असून** राज्यास भेट देणाऱ्या मा. विख्यात अभ्यांगतांच्या परिवहन व्यवस्थेसाठी भाडयाने घेण्यात आलेल्या खाजगी वाहनांची मूळ देयके प्रमाणित करुन जिल्हाधिकारी / नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा, वरळी, मुंबई यांच्या शिफारशीसह शासनाकडे सादर करण्याची दक्षती घेण्यात यावी.

६. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले असून, त्याचा सांकेतांक क्र. २०२६०३३०१११६५९३२०७ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

SHILPA SUSHIL DESHPANDE

Digitally signed by SHILPA SUSHIL DESHPANDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, 2.5.4.20=d9c4580847bd8cf4d0521d3ff5130bd2f0d81ed958a45352894648f507b7faed, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=8BAD65110E418C478564E341190F2889F781C1E4D9E81A543916EAA6A2F95E49, cn=SHILPA SUSHIL DESHPANDE
Date: 2026.03.30 11:18:23 +05'30'

**( शिल्पा देशपांडे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रति,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, लोकभवन, मलबार हिल, मुंबई
२) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
३) सचिव व मुख्य राजशिष्टाचार अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग ( राजशिष्टाचार ) मंत्रालय, मुंबई-३२
४) उप सचिव तथा संचालक ( राजशिष्टाचार ) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
५) सर्व जिल्हाधिकारी (राजशिष्टाचार कार्यालये).
६) पोलिस आयुक्त, मुंबई
७) सर्व जिल्हा पोलिस अधिक्षक,
८) नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा, वरळी, मुंबई.
९) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखापरिक्षा/लेखा अनुज्ञेयता ) मुंबई
१०) महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखापरिक्षा/लेखा अनुज्ञेयता ) नागपूर
११) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
१२) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१३) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१४) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी